# Dhave village sees 'puran sheti' revival

Rajendra P Kerkar / TNN / May 27, 2024, 00:46 IST

SHARE AA FOLLOW US



**Keri:**Harvesting of paddy cultivated in silt soil, traditionally known as 'puran sheti', commenced on Sunday at Dhave, Sattari.

This method of paddy cultivation was nearly discontinued in 2005 after bandharas were constructed in Mhadei river to store water at various places in Sattari.

However, several landless farmers from Uste, Sattari to Ganje, Ponda were involved in puran sheti in the past.

**News Paper Link:**
https://timesofindia.indiatimes.com/city/goa/dhave-village-sees-puran-sheti-revival/articleshow/110444977.cms

लोकमत

# रासायनिक खतांशिवाय पीक घेणे शक्य

## कुलगुरू मेनन : धावेतील 'पुरणी लुवण' उत्सवासाठी विद्यार्थी, अभ्यासकांची उपस्थिती

क्रांतिराज सम्राट

लोकमत न्यूज नेटवर्क

**सत्तरी :** 'पुरण शेतीचे पुनरुज्जीवन करण्यात गोवा विद्यापीठाला यश आले आहे. यंदा कमी जागेत पारंपरिक वैभव पुन्हा नव्या पिढीसमोर आणण्यासाठी केलेला हा प्रयोग यापुढे मोठ्या प्रमाणात राबविला जाईल. यातून रासायनिक खतांच्या मान्याशिवाय भात पीक घेणे शक्य असल्याचे सिद्ध झाले आहे,' असे प्रतिपादन गोवा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हरिलाल मेनन यांनी केले. धावे-तार येथे गोवा विद्यापीठाचे शणै गोंयबाब अध्यासन केंद्र आणि गोवा जैवविविधता मंडळाच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर पुनरुज्जीवित करण्यात आलेल्या पुरण शेतीच्या कापणीला (लुवण) रविवारी सुरुवात करण्यात आली. तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मेनन बोलत होते.

यावेळी जुने गोवे येथील आयसीएआरचे संचालक डॉ. प्रवीणकुमार, गोवा राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम, कोंकणी अध्ययन शाखेचे संचालक डॉ. हनुमंत चोपडेकर, रसायनशास्त्र महाशाळेचे अधिष्ठाता डॉ. सुंदर धुरी, मनोहर पर्रीकर स्कूल ऑफ लॉ, गव्हर्नन्स अॅण्ड पब्लिक पॉलिसी महाशाळेचे प्रा. राजेंद्र गाड, सत्तरीचे विभागीय कृषी अधिकारी विश्वनाथ गावस, डॉ. प्रकाश पर्येकर आणि जमीन मालक लक्ष्मण गावकर आदी उपस्थित होते.

गोपीनाथ गावस यांनी स्थानिक देवतांना गाऱ्हाणे घातल्यानंतर म्हादई नदी किनाऱ्यावरील या शेतीच्या कापणीला प्रा. मेनन यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली. 'पुरणी लुवण उत्सव' (शेती कापणी) पाहण्यासाठी राज्याच्या विविध भागातील पर्यावरणप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धावे येथे पुरण शेती कापणीच्या प्रारंभी कुलगुरू प्रा. हरिलाल मेनन, डॉ. हनुमंत चोपडेकर, डॉ. प्रकाश पर्येकर, डॉ. प्रवीणकुमार, डॉ. राजेंद्र गाड, डॉ. सुंदर धुरी, विश्वनाथ गावस, प्रा. विनय बापट, गोपिनाथ गावस. (छाया : गणेश शेटकर)

### राज्यात होते ५६० पुरण शेतकरी

शेतीच्या या प्रकाराचे पुनरुज्जीवन का करावेसे वाटले, याविषयी प्रकल्प प्रमुख डॉ. प्रकाश पर्येकर यांनी उपस्थितांना माहिती दिली. ते म्हणाले की, 'राज्यात १९९८ पर्यंत ३३ गावांत ५६० पुरण शेतकरी होते; मात्र नंतर नदीवर बंधारे उभारले गेले आणि पुरण शेती २००५ नंतर लुप्तच झाली. कारण ही शेती पूर्णपणे नैसर्गिक स्वरुपात केली जाते. यासाठी वापरले जाणारे पाणी हे थेट नदीतूनच शेतात येईल अशी रचना केली जाते. त्याबरोबर कोणत्याही प्रकारे रासायनिक खतांचा वापर केला जात नाही.'

### उत्पादकता वाढीसाठी 'हे करावे' लागेल

आयसीएआर जुने गोवाचे संचालक डॉ. प्रवीणकुमार म्हणाले की, 'इतर राज्यांच्या तुलनेत गोवा अन्नधान्य उत्पादनांबाबत मागे का आहे, याचा शोध घेणे गरजेचे आहे. येथील शेतकरी ज्या पिकांवर अवलंबून आहेत, ती पिके जुनी झाली आहेत, नवी बनविली गेली नाहीत किंवा बदली उत्पादनाकडे लक्ष दिलेले नाही. त्यावरही विचार करावा लागेल. येथील भात पिकाला राष्ट्रीय उत्पन्न सरासरीबरोबर जाण्यासाठी पुरण शेती उपयुक्त ठरेल; मात्र त्यासाठी युवकांना आकर्षित करावे लागेल. अधिक संशोधन करावे लागेल.'

### राज्यस्तरावर गौरव करणार

लुप्त झालेली पुरण शेती पुनरुज्जीवित करण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली, त्या सर्व शेतकऱ्यांचा राज्यस्तरावर गौरव करण्यासाठी शिफारस करणार आहे, असे जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव प्रदीप सरमोकादम यांनी यावेळी सांगितले.

Read the digital copy of Goa's Only Business Magazine
click here>

STARTUP NATION
MEDIA PLATFORM FOR THE STARTUP ECOS



AGRICULTURE

# Farmers and enthusiasts look to revive 'Puran Sheti'

21 February, 2024



A group of farmers from Tarir-Dhave have called for reviving *Puran Sheti* or the unique silt-based system of paddy cultivation, which once thrived along the Mhadei riverbank and was the only source of livelihood for a large number of farmers of Sattari taluka. This project is being encouraged by Dr Prakash S Parienkar, Associate Professor at Goa University and a Sahitya Akademi Award winner, who aims to document the unique farming practice to create awareness on it.

Dr Parienkar mentions that the people of Sattari have lost a great legacy from their ancestors as there were more than 550 families involved in this paddy cultivation along the bank of the Mhadei River and its tributaries.

"This was a major farming system in the taluka which needs to be preserved for posterity. This ancient form of farming was practised in the Western Ghats before ploughing of fields was known," explains Dr Parienkar.

He is the principal investigator of the project titled 'Rejuvenation of *Puran Sheti*', which aims at making photo and video documentation of the farming activity to create awareness among researchers, locals, writers, and students.

Under the project, around 300 square metre of land has been taken up in Dhave-Tarir to give a new lease of life to the moribund agriculture practice.

"*Puran Sheti* stopped completely after 2005 due to the construction of check dams on the Mhadei and other tributaries. I feel the farming technique needs to be documented in the form of photography and videography etc," Dr Parienkar, added that the organic farming system needs to be studied scientifically.



